मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वाहनाचा दंड थकीत आहे का? मग, दुर्लक्ष करु नका!

## पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय चा कारभार 'हायटेक' : सुमारे एक लाख वाहनधारकांना थकीत दंडाबद्दल संदेश पाठवण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

"तुमच्या वाहनाचा दंड थकीत आहे का ? किंवा योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करायचे राहिले आहे का ? मग, फार दुर्लक्ष करु नका ! कारण, पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) वाहनधारकांना आता मोबाईल संदेशाद्वारे थकीत दंडापासून ते योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणापर्यंतचे मागणीपत्र पाठविण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये सुमारे एक लाख वाहनधारकांना थकीत दंडाबद्दल संदेश पाठवण्यात येणार आहेत.

पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) चा कारभार 'हायटेक' झाला असून अनेक ऑनलाइन सुविधांमुळे नागरिकांची कामे देखील वेगाने होत आहेत. त्यामध्ये, वाहन धारकांना आता आपल्या वाहनांची माहिती 'आरटीओ'कडून प्राप्त होणार आहे. थकीत दंडापासून ते योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचा संदेश देखील मोबाईलद्वारे नागरिकांना प्राप्त होणार आहे. त्या संदेशामध्येच लिंकद्वारे संबंधित वाहनधारकाला पुढील प्रक्रिया करणे सोपे जाणार आहे. त्या माध्यमातून त्यांना मागणी पत्र प्राप्त होईल. परिणामी, आरटीओ कार्यालयातील हेलपाटे आणि वाहनधारकाचा वेळही वाचणार आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात ही सुविधा वाहनधारकांना सुरू करण्यात आली आहे.



### ही माहिती प्राप्त होणार...

» वाहनधारकांना वाहनावरील चलनाचा दंड भरणे, थकीत कर भरणे, परवाना नूतनीकरण, योग्यता प्रमाणपत्र व नूतनीकरण अशा विविध कामकाजाची माहिती देण्यासाठी लघु संदेश सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यामध्ये थकीत कर आणि दंड वसूल करण्याबाबत वाहनधारकांना मोबाईलच्या माध्यमातून नोटिसा प्राप्त होणार आहे. यापूर्वी वाहन धारकांना टपालाद्वारे नोटीस पाठवण्यात येत होती. मात्र, त्यामध्ये मोठा विलंब होत होता. तसेच, ती प्राप्त न झाल्याने अनेक वाहनधारकांना त्याची माहिती होत नाही. त्यामुळे, आता ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

### ऑनलाइन सेवेवर अधिकाधिक भर

» पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे, दैनंदिन कामकाजाला गती मिळावी, यासाठी 'आरटीओ'ने ऑनलाइन कामावर अधिक भर दिला आहे. कार्यालयाचा दर्जा वाढवून ते प्रादेशिक परिवहन कार्यालय करण्यात आल्याने गर्दीमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे, कार्यालयांतर्गत विविध बदल केले जात आहेत. वाहनधारकांना चॉइस नंबरसाठी थेट ऑनलाइन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्याला वाहनधारकांनी चांगला प्रतिसाद दिला. त्याचाच पुढील एक भाग म्हणून आता वाहनधारकांना त्यांच्या स्वतःच्या वाहनाची माहिती संदेशाद्वारे मोबाईल मार्फत प्राप्त होणार आहे.

### असे पहा मागणीपत्र...

» लघु संदेश सेवा अंतर्गत वाहनधारकास सीपी-आरटीओपीसीएम या नावाने लघु संदेश (एसएमएस) पाठवला जाणार आहे. या संदेशामध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर, कार्यालयाचे इंग्रजी व मराठी स्वरुपातील मागणीपत्र नागरिकांना पाहता येणार आहे.

" नवीन प्रणालीनुसार नागरिकांना पहिल्या टप्प्यामध्ये थकीत दंड आणि वसुलीबाबत वाहनधारकांना संदेश पाठवण्यात येणार आहेत. त्यानंतर योग्यता प्रमाणपत्र, परवाना नूतनीकरण, वेगवेगळे कर या संदर्भात देखील वाहनधारकांना माहिती प्राप्त होईल. त्याबाबत सेवा सुरू करण्यात आली आहे.
- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड.

# निरामय आनंदी जीवनाबाबत डॉ. विलास सोमवंशी यांचे पिंपळे सौदागर येथील ज्येष्ठांना मार्गदर्शन

## पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

निरामयता शरीराशी निगडीत आहे आणि आनंद हा मनाशी निगडीत आहे. तेंव्हा या दोन्ही गोष्टी प्राप्त करण्यासाठी सत्कर्म करीत रहा, इतरांना बदलायच्या भानगडीत न पडता स्वतःला बदला, सत्संग करा, अध्यात्माकडे वळा असे प्रतिपादन डॉ. विलास सोमवंशी यांनी केले.



सांगवीसह पिंपळे गुरव, रहाटणी, पिंपरी, काळेवाडी, वाकड या परिसरातील निळ्या पूररेषेत असलेल्या लाखो नागरिकांना महापालिकेच्या या कारवाईचा फटका बसणार आहे. या सर्वसामान्य नागरिकांच्या घरावर कोणतीही कारवाई करू नये, अशी मागणी करणारे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित "निरामय आनंदी जीवन" या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानात ते बोलत होते. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाष पवार आणि उपाध्यक्षा शकुंतला शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात रविवार दि.२९ रोजी हा कार्यक्रम झाला.

आपल्या व्याख्यानात डॉ. सोमवंशी यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना अध्यात्म आणि आरोग्य यांची योग्य सांगड घालून सुखी जीवनाचे मर्म समजाऊन सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला असोसिएशनचे सदस्य नीता गुप्ता, सुरेखा पाटील, शशिकांत कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, उषा भागवत, अशोक येळंमकर, शोभा पोरवाल यांनी कविता आणि गाणी सादर केली. प्रास्ताविक डॉ.सुभाष पवार यांनी केले. सुत्रसंचलन निर्मला कासार यांनी केले तर सखाराम ढाकणे यांनी आभार मानले.

# निलेश नेवाळे यांच्या वतीने आयोजित नोकरी महोत्सवात 'ऑन द स्पॉट' 355 जणांना नोकरी

## सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य नोकरी महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या)वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य नोकरी महोत्सवाला मोठा प्रतिसाद मिळाला. यामध्ये 534 जणांनी सहभाग घेतला. त्यातील 355 जणांना 'ऑन द स्पॉट' नोकरी देण्यात आली. तर, 123 जणांना दुस-या राऊंडमध्ये मुलाखतीसाठी बोलविण्यात आले आहे.



सामाजिक उपक्रमांनी निलेश नेवाळे यांचा वाढदिवस साजरा केला. घरकुल हॉस्पिटल येथे व्हील चेअर, बाकडे भेट देण्यात आले. मिठाईचे वाटप करण्यात आले. बेरोजगार तरुणांसाठी रविवारी (29) भव्य नोकरी महोत्सव घेण्यात आला. पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), हिंजवडी माहिती व तंत्रज्ञाननगरी (आयटी पार्क) मधील कंपन्यांसह बीव्हीजी कंपनी सहभागी झाली होती. या नोकरी महोत्सवात 534 जणांनी सहभाग घेतला. त्यातील 355 जणांना 'ऑन स्पॉट' नोकरी देण्यात आली. तर, 123 जणांना दुस-या राऊंडमध्ये मुलाखतीसाठी बोलविण्यात आले आहे. 355 जणांना जागेवर नोकरी मिळाली. याचे समाधान आहे. उर्वरित 123 जणांनाही लवकरच नोकरी मिळेल असा विश्वास नेवाळे यांनी व्यक्त केला.

सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. नेवाळे यांच्या आजपर्यंतच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. समाजासाठी सातत्याने करीत असलेल्या कामाचे कौतुक केले. भोसरीचे आमदार महेश लांडगे, कार्तिक लांडगे, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी नगरसेवक सुरेश तात्या म्हेत्रे, अंकुश मळेकर, किसन बावकर, दिनेश यादव, संतोष मोरे, विश्वास गजरामाल, कवितके दादा, घरकुल फेडरेशनचे अध्यक्ष सुधाकर धुरी, दत्तात्रय गव्हाणे, नविन बग, सुजित पाटील, गणेश पिंजण, माजी नगरसेविका योगिता नागरगोजे, सारिका पवार, नवनाथ जगताप, संदीप रासकर यांनी नेवाळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# स्वारगेट-पिंपरी मेट्रो प्रवास आजपासून अवघ्या 30 रुपयांत

## प्रवाशांची विनाविलंब वेगवान सोय होणार असल्याने सणासुदीच्या काळात मध्यवर्ती शहरातील खासगी वाहनांची संख्या कमी होईल

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेटहून पिंपरीला जाणाऱ्या प्रवाशांसाठी मेट्रोचा नवा मार्ग रविवारपासून सुरू झाला आहे. हा प्रवास अवघ्या ३० रुपयांत करता येणार आहे. शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रो मार्गिका रविवार दुपारी चार वाजल्यापासून वाहतुकीसाठी खुली आहे. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट मेट्रो गर्दीच्या वेळी दर सात मिनिटांनी तर कमी गर्दी वेळी दर दहा मिनिटांनी उपलब्ध होणार आहे.

स्वारगेटपासून मंडई अवघ्या दहा रुपयांत आणि जिल्हा न्यायालयापासून मंडई स्थानकापर्यंतचा प्रवास पंधरा रुपयांत करता येणार आहे. स्वारगेट ते जिल्हा न्यायालय मेट्रो सुरू झाल्याने पिंपरी चिंचवड, रामवाडी आणि वनाज परिसरातून शहराच्या मध्यवर्ती भागात येणाऱ्या प्रवाशांची विनाविलंब वेगवान सोय होणार असल्याने सणासुदीच्या काळात मध्यवर्ती शहरातील खासगी वाहनांची संख्या कमी होईल, अशी अपेक्षा आहे.

महामेट्रोच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात आलेल्या वनाज ते रामवाडी आणि पिंपरी चिंचवड ते स्वारगेट मार्गिका पूर्णपणे सुरू होत आहेत. या मार्गिकांवरील काही स्टेशनची कामे अद्याप अपूर्ण असली तरी प्रवासी वाहतुकीत कुठलीही अडचण येणार नसल्याचे मेट्रो प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

त्यानुसारच या दोन्ही मार्गिकांवरील काम जसजसे होत गेले तसतशी टप्प्याटप्प्याने मेट्रो सेवा सुरू करण्यात आली आहे. यातील शेवटच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या टप्प्यातील भुयारी मार्गातील सेवा रविवारी सुरू होत आहे. यामुळे वडगाव शेरी, येरवडा, पिंपरी चिंचवड, खडकी, कोथरूड परिसरातून शिवाजीनगर आणि शहराच्या मध्यवर्ती मंडई आणि स्वारगेट परिसरात येणाऱ्या नागरिकांना विनाविलंब सेवा उपलब्ध होणार आहे. चार ते रात्री आठदरम्यान दर सात मिनिटाला मेट्रो सेवा असेल. आठ ते दहादरम्यान दर १० मिनिटाला सेवा सुरू असेल. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेटपर्यंतची मेट्रो सेवा सायंकाळी सहापासून सुरू केली जाणार आहे. तोपर्यंत प्रवाशांना जिल्हा न्यायालयापर्यंत प्रवास करता येणार आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट दरम्यानचे प्रवासासाठी १५ रुपये आकारले जातील.



### नागरिकांना झटपट प्रवास मिळणार

» शहराच्या मध्यवर्ती भागात मुख्य अरुंद रस्ते, अतिक्रमणे आणि पार्किंगसाठी अपुरी जागा असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी पाहायला मिळते. मध्यवर्ती शहरातून बाहेर पडण्यासाठी एकेरी मार्गावरून धावणारी पीएमपी सेवा असली तरी वाहतूक कोंडीमुळे अवघे चार कि.मी.च्या प्रवासासाठी अर्धा ते पाऊण तास वेळ जातो. वरील उपनगरातून मंडई आणि स्वारगेट परिसरात येण्यासाठी त्याहून अधिक विलंब होतो. स्वारगेटपर्यंत मेट्रो उपलब्ध झाल्याने नागरिकांना झटपट प्रवास मिळणार आहे. पुणे मेट्रोचे सर्वाधिक तिकीट दर ३५ रुपये आहे.

### असे असतील तिकीट दर

- पिंपरी चिंचवड ते स्वारगेट ३० रुपये
- वनाझ ते स्वारगेट २५ रुपये
- रामवाडी ते स्वारगेट ३५ रुपये
- जिल्हा न्यायालय ते स्वारगेट १५ रुपये
- नळस्टॉप ते मंडई २० रुपये
- शिवाजीनगर ते मंडई १५ रुपये
- स्वारगेट ते मंडई १० रुपये

# मार्केट यार्डात नवीन कांद्याची आवक सुरू; भाववाढीला ब्रेक

## जुन्या कांद्याच्या भावात घाऊक बाजारात 6 रुपये घट

**पुणे | प्रतिनिधी**

लाल रंगाच्या नवीन हळवी कांद्याची आवक मार्केट यार्डात सुरू झाली आहे. त्यातच वखारीमध्ये साठवलेला कांद्याची आवक वाढली आहे. त्यामुळे कांदा भाववाढीला ब्रेक बसला आहे. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाल आहे. जुन्या कांद्याच्या भावात घाऊक बाजारात मागील आठवड्याच्या तुलनेत ६ रुपयांनी घट झाली आहे.

तर नवीन कांद्याला दर्जानुसार २० ते ३५ रुपये भाव मिळत आहे. परिणामी, किरकोळ बाजारात कांद्याच्या भावात घसरण झाली आहे. मागील आठवड्यात ७० ते ८० रुपये किलो भावाने विक्री होणाऱ्या कांद्याला आता ५० ते ६० रुपये भाव मिळत आहे. दक्षिण भारतातील राज्यातील कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश येथील कांद्याला देशभरातून मागणी वाढली आहे. परिणामी, कांद्याचे भावात वाढ होत होती.



मागील रविवारी (दि.२२) येथील बाजारात सुमारे ७० ट्रक आवक झाली. त्यामध्ये वाढ झाली असून, आज (दि.२९) १०० ट्रक आवक झाली. त्यामध्ये १० ट्रक नवीन कांदा आहे. मागील ३ ते ४ दिवसांपासून नवीन कांद्याची आवक होत आहे. त्यापैकी २ ते ३ ट्रकची कर्नाटक, हुबळी भागातून आवक झाली आहे.

उर्वरित नवीन कांद्याची पुरंदर तालुक्यातून आवक झाली आहे. पाऊसाने विश्रांती घेतल्यास येत्या ४ ते ५ दिवसात आणखी दर्जेदार नवीन कांदा दाखल होईल. नवीन कांद्यामुळे भाव घसरतील, या शक्यतेने वखारीत साठवूण ठेवलेला कांदा बाजारात आणण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे जुन्या कांद्याची आवक वाढली आहे. परिणामी, कांद्याच्या भावात घ्सरण होण्यास सुरूवात झाली आहे. मागील आठवड्यात जुन्या कांद्याला किलोला घाऊक बाजारात ४४ ते ४८ रुपये भाव मिळत होता. तो कमी होऊन आता ३५ ते ४२ रुपये मिळत आहे.

# पीएमआरडीए हद्दीत 10 अग्निशमन केंद्र मंजूर

## गुन्ह्यांत कलमवाढ! अल्पवयीन आरोपीचा पाय खोलात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी होत होती. अखेर प्राधिकरणाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दौंड, पुरंदर, मुळशी, शिरुर आणि खेड या या तालुक्यात प्रत्येकी एक तर, मावळमध्ये दोन आणि हवेली तालुक्यात तीन असे एकूण 10 अग्निशमन केंद्र मंजूर करण्यात आले आहे.

पीएआरडीएच्या हद्दीत ८१४ गावांचा समावेश होतो. प्राधिकरणाच्या हद्दीत औद्योगिक कंपन्या अनेक आहेत. तसेच औद्योगिक वसाहतीही आहेत. याचसह मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यामुळे अग्निशमन केंद्रांची आवश्यकता आहे.



जर एखादी दुर्घटना घडली तर पुणे , पिंपरी चिंचवड शहरातून अग्निशमन केंद्रांतून गाड्या बोलवाव्या लागतात. अंतर जास्त असल्याने या गाड्या पोहचण्यास उशीर लागतो. त्यामुळे प्राधिकरणाच्या हद्दीत अग्निशमन केंद्र स्थापन करण्याची मागणी होत होती.

पीएमआरडीए हद्दीतील ३४ जागांवर या केंद्रांसाठी आरक्षण टाकण्यात आले. त्यातील दहा जागा निश्चिच करून तेथे अग्निशमन आणि व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यासाठी १५० कोटी रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. यामध्ये अग्निशमन केंद्राची इमारत, कर्मचारी निवासस्थाने, वाहने आणि यंत्रसामुग्रीबाबत कामे करण्यात येणार आहे.

याठिकाणी होणार अग्निशमन केंद्र -

दौंड – केडगाव, शिरूर – शिक्रापूर ,मावळ – कान्हे ,पुरंदर – दिवे, मावळ – पाटण, मुळशी – म्हाळुंगे ,खेड – येवलेवाडी ,हवेली – वडाचीवाडी, औताडे-हांडेवाडी , मांजरी-वडाचीवाडी.

# फुगेवाडीत उभारले आरोग्यवर्धिनी केंद्र

## नागरिकांना अनेक उपचार मोफत दिले जाणार : 'सीएसआर'च्या माध्यमातून केली उभारणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला पायाभूत देताना वैद्यकीय सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर महापालिकेने भर दिला आहे. प्रकल्प विकास कामात सीएसआर निधीतून अनेक महत्त्वपूर्ण कामे केली जात आहेत. त्यानुसार सीएसआर निधीतून फुगेवाडीला आरोग्यवर्धिनी केंद्र तयार केले असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी व्यक्त केले.



महापालिकेच्या सांगवी रुग्णालयाच्या अंतर्गत फुगेवाडी येथे आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, साहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, सांगवी रुग्णालयाच्या ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, सीएसआर सेल सल्लागार श्रुतिका मुंगी, थायसेनक्रुप उद्योग समूह सीएसआर सेलच्या पूजा, दिव्या आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले, सीएसआर सेलच्या माध्यमातून शहरात अनेक लोकोपयोगी कामे होऊ शकतात. महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेले आरोग्यवर्धिनी केंद्र याचे उत्तम उदाहरण आहे. शहरात विविध ठिकाणी आणखी ६७ आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या आरोग्यवर्धिनी केंद्रांद्वारे नागरिकांना अनेक उपचार मोफत दिले जाणार आहेत. त्यामध्ये वृद्धावस्थेतील नागरिकांच्या आरोग्याबाबत समस्यांची तपासणी, साहाय्यक उपचार आणि समुपदेशन अशा विविध सुविधांचा समावेश आहे.

या केंद्राद्वारे गर्भधारणा आणि बाळंतपणाची काळजी, नवजात आणि अर्भकांची काळजी, बालपण आणि पौगंडावस्थेतील आरोग्य, कुटुंब नियोजन आणि गर्भनिरोधक सेवा, संसर्गजन्य रोगांचे व्यवस्थापन, विविध आरोग्य कार्यक्रम, नेत्ररोग आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा अशा विविध सेवा पुरविण्यात येणार आहेत, अशी माहितीही आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी यावेळी दिली.

### आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एकूण 7 कक्ष

» आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एकूण ७ कक्ष उभारण्यात आले आहेत. या सात कक्षांमध्ये केस पेपर नोंदणी, बाह्यरुग्ण विभाग, इंजेक्शन व ड्रेसिंग रूम, प्रयोगशाळा विभाग, औषध वाटप, नियमित लसीकरण कक्ष, वेलनेस ॲक्टिव्हीटी रूम आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. सीएसआर निधीतून उभारण्यात आलेल्या या केंद्रासाठी थायसेनक्रुप या कंपनीने सर्व सामग्री तसेच उभारणीचे कामकाज केले आहे.

" आशा सेविकांमार्फत परिसरातील सर्व नागरिकांना आरोग्यवर्धिनी केंद्राबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. फुगेवाडी येथे उभारण्यात आलेल्या या केंद्रामुळे आजूबाजूच्या परिसरातील सुमारे १२ हजार नागरिकांना याचा लाभ होणार आहे.शहरातील आणखी ६७ ठिकाणी या केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. जेणेकरून झोपडपट्टीसदृश भागात किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही मोफत वैद्यकीय सुविधा पुरवण्यास मदत मिळेल. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे केंद्र सुरू राहणार असून येत्या काही दिवसांत मनुष्यबळ वाढवून सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत केंद्र सुरू ठेवण्याचा महापालिकेचा मानस आहे. जेणेकरून ज्यांना कामामुळे सकाळी उपचार घेणे शक्य नसेल ते संध्याकाळीही उपचारासाठी डॉक्टरांची भेट घेऊ शकतात.

- डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी.

# लाडक्या बहिणींनी दिली पोस्टाला पसंती

## मागच्या तीन महिन्यांत 13 हजार महिलांनी उघडले खाते : दिवसाकाठी 600 नवी खाती

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली. या योजनेसाठी महिलांना बँक खाते आवश्यक होते. ज्या महिलांचे बँक खाते नाही, त्यांना खाते उघडण्यासाठी बँकांमध्ये गर्दी दिसून येत आहे. खाते उघडताना होणारी पायपीट यामुळे महिलांनी थेट पोस्टाचे बचत खाते उघडण्यास प्राधान्य दिले आहे.



फक्त आधार कार्डवरच टपाल विभागात खाते उघडण्यात येत असल्याने, पात्र महिलांना कोणत्याही बँकेत खाते नसले तरी दरमहा १५०० रुपये मिळणे शक्य झाले आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये पिंपरी-चिंचवड शहरातील टपाल कार्यालयांत १३ हजार महिलांनी खाती उघडली आहेत. तसेच प्रत्येक दिवसाला टपाल कार्यालयात ५०० ते ६०० महिला बचत खाते उघडत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत ३३ टपाल विभाग आहेत. प्रत्येक दिवसाला इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या विभागात महिलांची खाते उघडण्यासाठी वाढ होत आहे. अनेक महिला निरक्षर असल्याने या महिलांना बँक खात्यांसंदर्भात सविस्तर माहिती नसल्याने महिलांच्या विविध टपाल कार्यालयात रांगा लागलेल्या आहेत. त्यामुळे एरवी मोकळी असलेली टपाल कार्यालये आता गजबजू लागली आहेत.

" दररोज पिंपरी-चिंचवड टपाल उपविभागाच्या ३३ टपाल कार्यालयाच्या अंतर्गत साधारण ५४५ महिलांची खाती उघडली जातात. योजना चालू झाल्यापासून जवळपास १३,००० महिलांनी टपाल विभागाच्या इंडिया पोस्ट पेमेंट बँकेचे डिजिटल खाते उघडले आहे. पोस्टात खातेधारकांना सुरक्षा वाटते तसेच चांगल्या सुविधा व झटपट काम होत असल्यामुळे ग्राहक टपाल कार्यालयात खाती उघडण्यासाठी आकर्षित होत आहेत.

- नितीन बने, जनसंपर्क निरीक्षक अधिकारी.

### बँकांत नव्हे टपाल कार्यालयात गर्दी

केवळ २०० रुपयांत उघडण्यात येते खाते

फक्त पाच मिनिटांत उघडून मिळते खाते

खाते उघडण्यासाठी खातेदाराचे आधारकार्ड आणि मोबाइल नंबरचीच गरज

कोणतीही कागदपत्रे किंवा झेरॉक्स पेपर देण्याची नाही गरज

# चाकण एमआयडीसीतून 50 कंपन्या परराज्यांत स्थलांतरित!

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांचा गौप्यस्फोट : उद्योग संघटनेकडून दुजोरा



**पुणे | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक वसाहत हे वाहननिर्मिती उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र आहे. चाकणमधील पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाला आहे. सरकारी यंत्रणांकडून बैठका घेण्याशिवाय कोणतीच पावले उचलली जात नाहीत. यामुळे आतापर्यंत चाकण एमआयडीसीतील सुमारे ५० कंपन्या गुजरात, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये स्थलांतरित झाल्या आहेत, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी केला आहे. याला चाकणमधील उद्योग संघटनेने दुजोरा दिला आहे.

चाकण औद्योगिक वसाहतीत मर्सिडीज बेंझ, फोक्सवॅगन, ब्रीजस्टोन, ॲटलास कॉप्कोसह अनेक जागतिक पातळीवरील कंपन्या आहेत. येथील वाहतूक कोंडीसह अपुऱ्या पायाभूत सुविधांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जुलै महिन्यात उच्चस्तरीय बैठक मुंबईत घेतली होती. त्यानंतर स्थानिक यंत्रणांनी चाकणमधील उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी पावले उचलणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात केवळ चर्चेच्या फेऱ्या सुरू असून, उपाययोजना करण्यासाठी पावले उचलण्यात आलेली नाहीत. यामुळे कंपन्या परराज्यांत स्थलांतरित होत असल्याचा मुद्दा चाकणमधील उद्योगांची संघटना फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजकडून वारंवार उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर जयराम रमेश यांनी समाज माध्यमावर काही प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, चाकण हे महत्त्वाचे वाहननिर्मिती केंद्र असून, तेथील पायाभूत सुविधांची अवस्था अतिशय खराब आहे. त्यामुळे अनेक मोठ्या कंपन्या तेथून काढता पाय घेत आहेत. तिथे रस्त्यांचे काम सुरू असले तरी खड्ड्यांची समस्या कायम आहे. खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीसह अपघात वाढले आहेत. यामुळे कंपन्यांच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. कंपन्यांना कच्चा माल वेळेवर मिळण्यास आणि तयार उत्पादन बाजारपेठेत पोहोचविण्यास उशीर होत आहे. उद्योग संघटनांकडून वारंवार तक्रारी आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका होऊनही कोणतीही प्रगती झालेली नाही. आतापर्यंत ५० कंपन्या येथून गुजरात, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशसारख्या राज्यात स्थलांतरित झाल्या आहेत.

> “ महाराष्ट्रात गुंतवणूक टिकवून ठेवणे अतिशय महत्त्वाचे असताना चाकणमधील कंपन्या येथून परराज्यांत स्थलांतरित होत आहेत. याआधीही अनेक उद्योग महाराष्ट्रातून गुजरातमध्ये गेले आहेत. सरकारच्या नाकर्तेपणामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या जात आहेत.
> 
> **- जयराम रमेश, ज्येष्ठ नेते, काँग्रेस.**

> “ चाकणमधील स्थितीबाबत जयराम रमेश यांनी केलेल्या दाव्यात तथ्य आहे. अनेक कंपन्या परराज्यांत स्थलांतरित झाल्या आहेत. याचबरोबर आताही अनेक कंपन्या परराज्यांत जागा शोधत आहेत. अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि वाहतूक कोंडीमुळे येथील उद्योगांचा श्वास कोंडला आहे. कोंडीमुळे कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन प्रवासात दररोज दोन ते तीन तासांचा वेळ वाया जात असून, उत्पादकतेला फटका बसत आहे.
> 
> **- दिलीप बटवाल, सचिव, फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीज.**

# पुण्यात फळभाज्यांची आवक 'जैसे थे'

## टोमॅटो, फ्लॉवर, ढोबळी मिरची महागली : बाजारात 90 ट्रकमधून शेतमाल दाखल



**पुणे | प्रतिनिधी**

पितृपंधरवडा सुरू असल्याने बाजारात भेंडी, गवार, चवळी, काकडी, कारली, गाजर, घेवडा व तांबड्या भोपळ्याला मागणी टिकून आहे. या फळभाज्यांची आवक चांगली होत असल्याने भाव स्थिर आहेत. बाजारात दाखल होत असलेल्या मालाच्या तुलनेत मागणी वाढल्यामुळे टोमॅटो, फ्लॉवर, ढोबळी मिरचीचे भाव वधारले आहेत. तर, मागणीअभावी कांदा आणि घेवड्याच्या भावात घट झाल्याचे सांगण्यात आले.

रविवारी (दि. 29) येथील बाजारात राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे 90 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गत आठवड्याच्या तुलनेत ती स्थिर राहिली. मागणी आणि पुरवठा, यातील समतोलामुळे उर्वरित फळभाज्यांचे भाव स्थिर राहिल्याची माहिती ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली. परराज्यांतून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात आणि आंध्र प्रदेश येथून हिरवी मिरची 7 ते 8 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 7 ते 8 टेम्पो, कर्नाटक येथून पावटा 3 ते 4 टेम्पो, आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथून शेवगा 2 टेम्पो, इंदूर येथून 5 ते 6 टेम्पो गाजर, कर्नाटक आणि गुजरात येथून घेवडा 4 ते 5 टेम्पो, कर्नाटक, गुजरात येथून 2 टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेश येथून लसूण सुमारे 8 ते 10 टेम्पो इतकी आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकेमध्ये सातारी आले सुमारे 500 ते 700 गोणी, भेंडी 7 ते 8 टेम्पो, गवार 4 ते 5 टेम्पो, टोमॅटो 7 हजार पेटी, हिरवी मिरची 3 ते 4 टेम्पो, काकडी 7 ते 8 टेम्पो, फ्लॉवर 8 टेम्पो, कोबी 5 ते 6 टेम्पो, सिमला मिरची 8 ते 10 टेम्पो, भुईमूग शेंग 50 ते 60 गोणी, मटार पुरंदर, पारनेर, वाई आणि सातारा परिसरातून 80 ते 100 गोणी, तांबडा भोपळा 10 ते 12 टेम्पो, कांदा सुमारे 100 ट्रक, इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 30 टेम्पो आवक झाली होती.